# नागरिकांची सनद

# २०२४-२०२५

## नियंत्रक शिधावाटप व संचालक

## नागरी पुरवठा, मुंबई.

# नागरी सनद

सर्वसामान्य जनतेला जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत व योग्य प्रमाणात तसेच रास्त बाजारभावाने उपलब्ध व्हावा या दृष्टीने जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन, धंदा/व्यवसाय/व्यापार यावर शासनाचे नियंत्रण असण्याकरीता मुख्यत्वेकरून **जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५** हा सन १९५५ सालापासून केंद्र शासनामार्फत भारतात लागू करण्यात आला आहे. या कायद्याचा मुख्य उद्देश म्हणजे खुल्या बाजारात जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीतपणे व पुरेशा प्रमाणात होऊन या वस्तूंच्या होणा-या काळयाबाजारास व गैरव्यवहारास प्रतिबंध घालणे हा आहे. या कायद्यान्वये अन्नधान्य, साखर, केरोसिन, पामतेल, डाळी वगैरे जीवनावश्यक वस्तू म्हणून निर्धारीत केलेल्या आहेत.

जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ चा वापर करून महाराष्ट्र शासनाने **दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स, रेशनिंग (द्वितीय) ऑर्डर १९६६** हे आदेश अंमलात आणले. **सदर आदेशाच्या कलम १ (३) अन्वये मुंबई शिधावाटप यंत्रणा ही दि.१ मार्च, १९६६ पासून अस्तित्वात आली आहे.**

**दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स, रेशनिंग ((द्वितीय) रेग्युलेशन्स १९६६** हे आदेश **दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स, रेशनिंग (द्वितीय) ऑर्डर १९६६** च्या खंड १० नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून अंमलात आणले आहेत. सदर आदेशान्वये शिधावाटप क्षेत्रात नियंत्रित शिधाजिन्नसांच्या वितरणाची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

जीवनावश्यक वस्तूंचे योग्यरित्या वितरण करण्यासाठी महाराष्ट्र अन्नधान्य नियंत्रण (**द्वितीय**) आदेश १९६६ अन्वये मार्च १९६६ मध्ये विविध नियम तयार करून त्याची अंमलबजावणी सुरु झाली. मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील औद्योगिक विभाग मुख्यत्वेकरून कल्याण, भिवंडी, उल्हासनगर, बेलापूर, अंबरनाथ, डोंबिवली, बदलापूर, वाशी, भाईंदर इ. विभाग सामावले गेले. जीवनावश्यक वस्तूंचा रास्त भावात पुरवठा करून त्याचे योग्य प्रमाणात वाटप करण्यासाठी मुंबई शिधावाटप यंत्रणा दि.१ मार्च, १९६६ पासून प्रत्यक्षात कार्यरत झाली.

**सदर यंत्रणेवर शासकीय पातळीवर अन्न व नागरी पुरवठा विभागातर्फे नियंत्रण ठेवले जाते.** शासनाच्या जीवनावश्यक वस्तूंसंदर्भातील विविध योजना/नियम यांची अंमलबजावणी करण्याचे काम नियंत्रक शिधावाटप यांचेमार्फत केले जाते. **नियंत्रक शिधावाटप हे शिधावाटप यंत्रणेचे प्रमुख असून मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात सद्यस्थितीत एकूण ५ परिमंडळ व परिमंडळ कार्यालयाच्या अधिनस्त एकूण ४६ शिधावाटप कार्यालये कार्यरत आहेत.** मुंबई शिधावाटप यंत्रणेत उपनियंत्रक शिधावाटप, सहाय्यक नियंत्रक शिधावाटप, शिधावाटप अधिकारी, सहाय्यक शिधावाटप अधिकारी, शिधावाटप निरिक्षक व लिपिक यांचेमार्फत सर्वसामान्य जनतेस नियंत्रित जिन्नसांचा पुरवठा सुरळीतपणे व पुरेसा होण्याच्या दृष्टीने सुनियोजित पध्दतीने प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे.

शिधावाटप अधिकारी हे शिधावाटप कार्यालयांचे प्रमुख असून त्यांच्या विभागात पुरवठा होणा-या नियंत्रित जिन्नसांच्या कामी त्यांचेकडून नियंत्रण केले जाते तसेच त्यांच्या विभागात दिल्या जाणाऱ्या वेगवेगळया शिधापत्रिकांच्या कामकाजाबाबतही शिधावाटप अधिकारी यांचे नियंत्रण असते.

अशाप्रकारे मुंबई/ठाणे शिधावाटप यंत्रणेची रचना व त्याची कार्यपद्धती असून सन १९६६ पासून आजतागायत सदर यंत्रणेने त्यांच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी वर्गामार्फत शासनाच्या वेळोवेळी जाहीर झालेल्या योजनांची यशस्वीपणे तसेच प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली आहे.शिधावस्तू प्राप्त करून घेण्यासाठी प्रत्येक व्यक्ती अथवा कुटुंबाकडे शिधापत्रिका असणे आवश्यक आहे.

अधिकृत शिधावाटप दुकानातून शिधाजिन्नस प्राप्त करून घेण्यासाठी प्रत्येक व्यक्ति अथवा कुटुंबाने शिधापत्रिका शिधावाटप कार्यालयातून घेणे अत्यावश्यक आहे. नवीन शिधापत्रिका मिळणे, शिधापत्रिकेत नांव वाढविणे, नांव कमी करणे, पत्त्यामध्ये बदल करणे, हरविलेल्या /फाटलेल्या /खराब शिधापत्रिकेसाठी शिधावाटप कार्यालयातून वेगवेगळे अर्ज मिळतात. त्याकरीता रूपये २/- शुल्क आकारले जाते. तसेच सदरचे अर्ज महाराष्ट्र शासनाच्या http://controllerofrationing-mumbai.gov.in या संकेतस्थळावर जनतेसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर अर्जावर रूपये २/-चा कोर्ट फी स्टँम्प लावणे आवश्यक आहे. शिधापत्रिकेसाठी अर्जदाराने स्वत: अर्ज करावा.

## नवीन शिधापत्रिकेकरिता आकारण्यात येणारे दर

| अ.क्र. | शिधापत्रिकेचा प्रकार | शिधापत्रिकेसाठी आकारण्यात येणारा दर |
|---|---|---|
| १ | नवीन पिवळी शिधापत्रिका | रु. १०/- |
| २ | नवीन केशरी शिधापत्रिका | रु. २०/- |
| ३ | नवीन शुभ्र शिधापत्रिका | रु. ५०/- |
| ४ | दुय्यम पिवळी शिधापत्रिका | रु. २०/- |
| ५ | दुय्यम केशरी शिधापत्रिका | रु. ४०/- |
| ६ | दुय्यम शुभ्र शिधापत्रिका | रु. १००/- |

नवीन शिधापत्रिका मिळणे, शिधापत्रिकेत नांव वाढविणे, नांव कमी करणे, पत्त्यामध्ये बदल करणे, हरविलेल्या/फाटलेल्या/खराब शिधापत्रिका रद्द करून तसे प्रमाणपत्र देणे या कामकाजाकरिता खालीलप्रमाणे कालमर्यादा विहित करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | कालावधी |
|---|---|---|
| १ | नवीन शिधापत्रिका देणे | ३० दिवस |
| २ | शिधापत्रिकेत नांव वाढविणे (गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस) | ३० दिवस |
| ३ | शिधापत्रिकेत नवीन जन्मलेल्या मुलाचे नांव वाढविणे (१६ वर्षाआतील) | ३ दिवस |
| ४ | शिधापत्रिकेत नोंद असलेल्या लहान मुलांचे एकांके वाढविणे | ३ दिवस |
| ५ | शिधापत्रिकेतून नांव कमी करणे | ३ दिवस |
| ६ | हरविलेल्या शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका देणे | ३० दिवस |
| ७ | फाटलेल्या / खराब शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका देणे. ( गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस ) | ६ दिवस |

| | | |
|---|---|---|
| ८ | पत्ता बदल | ३० दिवस |
| ९ | शिधापत्रिका रद्द करून तसे प्रमाणपत्र देणे | ३ दिवस |

नवीन शिधापत्रिका मिळणे, शिधापत्रिकेत नांव वाढविणे, नांव कमी करणे, पत्त्यामध्ये बदल करणे, हरविलेल्या /फाटलेल्या /खराब शिधापत्रिका रद्द करून तसे प्रमाणपत्र देणे या कामकाजाकरीता आवश्यक कागदपत्रांची सूची पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | नवीन शिधापत्रिका देणे | १. पूर्वीची शिधापत्रिका रद्द केल्याचा/शिधापत्रिकेमधून नांव कमी केल्याचा दाखला<br>२. जागेसंबंधी भाडेपावती, बँक पासबुक, विजेचे देयक, दूरध्वनी देयक, ड्रायव्हिंग लायसन्स,ओळखपत्र (कार्यालयीन/इतर), शासकीय वसाहत, म्हाडा, सिडको यांचेसंबंधी ताबापत्र यापैकी कोणताही एक पुरावा<br>३. सर्व सदस्यांचे आधारकार्ड<br>४. ज्येष्ठ महिलेचे बँक पासबुक |
| २ | शिधापत्रिकेत नांव वाढविणे | १. पूर्वीची शिधापत्रिकेमधून नांव कमी केल्याचा दाखला<br>२. १६ वर्षापर्यंत वय असल्यास जन्म दाखला<br>३. आधारकार्ड |
| ३ | शिधापत्रिकेतून नांव कमी करणे | १. व्यक्ती मयत असल्यास मृत्युचा दाखला<br>२. ज्याचे नांव कमी करावयाचे अशा व्यक्तिची उपस्थिती व संमतीपत्र/अशी व्यक्ती उपस्थित राहू शकत नसल्यास त्याचे सत्यप्रतिज्ञापत्र |
| ४ | दुय्यम शिधापत्रिका देणे | १. मूळ शिधापत्रिका हरविली/गहाळ झाली असल्यास नजीकच्या पोलीस स्टेशनला नोंदविलेल्या तक्रारीची प्रत अथवा सत्य प्रतिज्ञापत्र<br>२. जागेचा पुरावा<br>३. खराब अथवा फाटलेली शिधापत्रिका |
| ५ | पत्ता बदल | जागेसंबंधी भाडेपावती, बँक पासबुक, विजेचे देयक, दूरध्वनी देयक, ड्रायव्हिंग लायसन्स, शासकीय वसाहत, म्हाडा, सिडको यांचे संबंधी ताबापत्र यापैकी कोणताही एक पुरावा, ओळखपत्र (कार्यालयीन/इतर) |

उपरोक्त कालावधीत ही कामे पूर्ण करण्यासाठी सक्षम प्राधिकारी व ही कामे विहीत कालावधीत पूर्ण न झाल्यास तक्रार निवारणासाठी प्राधिकारी खालीलप्रमाणे आहेत.

मुंबई / ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी उपनियंत्रक शिधावाटप हे कामकाजासाठी सक्षम प्राधिकारी असून नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई हे तक्रार निवारण करण्यासाठी प्राधिकारी आहेत.

**शिधापत्रिका** देताना अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर अर्जदार रहात आहे किंवा कसे ? याबाबत शिधावाटप निरीक्षकामार्फत खातरजमा करुन शिधापत्रिका दिली जाते. कोणत्याही व्यक्तीने

एकापेक्षा अधिक शिधापत्रिका मिळविणे किंवा एकापेक्षा अधिक शिधापत्रिकेत नांव नोंदविणे हे बेकायदेशीर असून ती व्यक्ती गुन्ह्यास पात्र ठरतात.

शिधापत्रिका ही शासनाची मालमत्ता असल्याने शिधावाटप निरीक्षक अथवा संबंधित अधिकारी यांनी मागणी केल्यानंतर त्यांना चौकशीसाठी दाखविली पाहिजे. तसेच शिधापत्रिका ही अधिकृत शिधावाटप दुकानातून शिधावस्तू घेण्यासाठीच असून तिचा रहिवासाचा पुरावा किंवा अन्य कारणास्तव वापर करता येणार नाही. जे अर्जदार भारतीय नागरीक असल्याबाबत लिहून देणार नाहीत त्यांना किंवा विदेशी नागरिकांना शिधापत्रिका देण्यात येणार नाहीत.

## तिहेरी शिधापत्रिका योजना

सर्वसाधारणपणे जी कुटुंबे शिधाजिन्नस घेत नाहीत अशा कुटुंबाना शिधाजिन्नस देण्याचे बंद केल्याने शिधावस्तूंच्या गैरव्यवहारास आळा बसेल व जास्त गरजू कुटुंबाना शिधापत्रिकेवर शिधावस्तू उपलब्ध करून देता येईल याकरिता शासनाकडून दिनांक १ मे, १९९९ पासून राज्यामध्ये तिहेरी शिधापत्रिका योजना सुरु करण्यात आली.

### तिहेरी शिधापत्रिकांसाठी निकष

**अ) पिवळया शिधापत्रिकांसाठी निकष-**

१. मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्रातील ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रूपये १५०००/- आहे, अशा कुटुंबाना पिवळया शिधापत्रिका देण्यात येतात.

२. खालील नमूद केलेल्या एका किंवा अनेक अटीत बसणारी कुटुंबे पिवळया शिधापत्रिकेसाठी अपात्र राहतील.

- कुटुंबातील कोणीही व्यक्ति डॉक्टर, वकील, स्थापत्य विशारद, चाटर्ड अकाऊन्टट असल्यास,
- कुटुंबातील कोणीही व्यक्ति व्यवसाय कर, विक्री कर किंवा आयकर भरत असल्यास किंवा भरण्यास पात्र असल्यास,
- कुटुंबाकडे यांत्रिक दुचाकी किंवा चार चाकी वाहन असल्यास,
- कुटुंबातील सर्व व्यक्तिच्या नावे मिळून एकूण दोन हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त बारमाही बागायती शेतजमीन असू नये. (दुष्काळी भागात याच्यापेक्षा दुप्पट क्षेत्र)

**ब) केशरी शिधापत्रिकांसाठी निकष-**

खालील अटींची पूर्तता करणाऱ्या कुटुंबाना केशरी शिधापत्रिका देण्यात येतात :-

- कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रूपये १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त नसावे.
- कुटुंबातील कोणाही व्यक्तिकडे चार चाकी यांत्रिक वाहन नसावे. (टॅक्सी चालक वगळून)

- कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या नावे मिळून चार हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त बारमाही बागायती शेतजमीन असू नये.

**क) शुभ्र शिधापत्रिकांसाठी निकष-**

ज्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचे मिळून एकत्रित वार्षिक उत्पन्न रूपये १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त असेल किंवा त्या कुटुंबातील कोणाही व्यक्तीकडे चार चाकी यांत्रिक वाहन असेल किंवा कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या नांवे मिळून चार हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त बारमाही बागायती शेतजमीन असेल अशा कुटुंबांना शुभ्र शिधापत्रिका देण्यात येतात.

**प्राधान्य गटातील लाभार्थ्यांकरीता निकष :-**

राष्ट्रीय अन सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सध्याच्या बीपीएल शिधापत्रिकांव्यतिरिक्त एपीएल (केशरी) गटातून कमाल वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ५९,०००/- पर्यंत उत्पन्न असलेल्या शिधापत्रिकाधारकांची (उपलब्ध इष्टांकानुसार) प्राधान्य गटातील लाभार्थी म्हणून निवड करण्यात येते.

## शिधावस्तूंची अनुज्ञेयता -

अंत्योदय व प्राधान्य गटातील (प्राधान्य कुटुंब) केशरी रंगाच्या शिधापत्रिकाधारकांना उपलब्ध असलेल्या सर्व शिधावस्तूंचे वितरण करण्यात येत असून शुभ्र रंगाच्या शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य, तेल पुरवठयातून वगळण्यात आले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरीत करण्यात येणा-या शिधावस्तूंच्या किंमती व परिमाण याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | योजना/पात्र लाभार्थी | शिधाजिन्नस | दर प्रति किलो रु. | परिमाण |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना | | | | |
| १. | प्राधान्य कुटुंब | तांदूळ | मोफत | प्रति व्यक्ती ३ किलो |
| | | गहू | | प्रति व्यक्ती २ किलो |
| | अंत्योदय अन्न योजना | तांदूळ | | प्रति शिधापत्रिका २० किलो |
| | | गहू | | प्रति शिधापत्रिका १५ किलो |
| २ | अंत्योदय अन्न योजना | साखर | रु.२०/- | प्रति शिधापत्रिका १ किलो (सुलभ पॅकिंगसह) |

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत लाभार्थ्यांना साखर वितरीत करण्यासाठी साखरेची खरेदी ई-लिलाव पध्दतीने घेण्यात येते.

केंद्र शासनाच्या दिनांक १२ मे, २०१७ च्या पत्रान्वये व केंद्र शासनाच्या दिनांक १ जून, २०१७ च्या मार्गदर्शक सूचनानुसार फक्त अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना प्रतिमहा प्रति कुटुंब १ किलो याप्रमाणे साखर वाटप करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या आदेशान्वये शासन निर्णय क्र.साखर/१११७/ प्र.क्र.६५/नापु-१९, दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ नुसार साखरेचा विक्रीचा दर रु.२०/- प्रति किलो व साखर

वाटपाचे प्रमाण फक्त अंत्योदय लाभार्थ्यांसाठीच प्रतिमहा प्रति कुटुंब १ किलो करण्यात आले आहे. यासाठी केंद्र शासन प्रति किलो रु.१८.५०/- एवढे अनुदान देत आहे.

## शिवभोजन योजना

शासन निर्णय दिनांक ०१ जानेवारी, २०२० अन्वये गरीब व गरजू व्यक्तींना स्वस्त दरात "शिवभोजन" उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या शिवभोजन केंद्राच्या प्रस्तावांना शासनाच्या मान्यतेनुसार व मंजूर करण्यात आलेल्या थाळ्यांच्या इंष्टांकाच्या मर्यादेत "शिवभोजन" केंद्र मंजूर करण्यात येत असून सदर शिवभोजन केंद्रांमधून गरीब व गरजू व्यक्तींना शिवभोजन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर शिवभोजन केंद्रामधून २ चपात्या, १ वाटी भाजी, १ मूद भात व १ वाटी वरण समाविष्ट असलेली जेवणाची थाळी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. शिवभोजन थाळीचा दर प्रति थाळी रु.१०/- असा आहे.

सदर थाळीची किंमत शहरी भागामध्ये प्रतिथाळी रु.५०/- व ग्रामीन भागामध्ये प्रतिथाळी रु.३५/- इतकी आहे. प्रति ग्राहकांकडून प्राप्त झालेल्या रु.१०/- एवढ्या रकमेव्यतीरिक्त उर्वरित रक्कम अनुदान म्हणून शासनाकडून देण्यात येते.

प्रत्येक लाभार्थ्याचा फोटो शिवभोजन ॲपमध्ये अपलोड करुन त्यानंतरच थाळी वितरीत केली जोते. शिवभोजन केंद्रचालकास देयक अदा करताना सदरहू अपलोड फोटोची पडताळणी करुन देयक अदा केले जाते.

## बायोमेट्रिक ओळख पटवून पात्र लाभार्थ्यांना शिधाजिन्नस वितरण करणेबाबत.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात माहे एप्रिल २०१८ पासून सर्व पात्र लाभार्थ्यांची माहिती Ration Card Management System ( RCMS ) या ऑनलाईन प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. प्रत्येक शिधापत्रिकांना १२ अंकी नंबर देण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात माहे डिसेंबर २०१९ पासून ४२७५ अधिकृत शिधावाटप दुकानात पॉस मशिनचा **(Point Of Sale)** चा वापर सुरु करण्यात आला आहे. माहे एप्रिल २०१८ पासून **Aadhar enabled pubic distribution system (AePDS)** या ऑनलाईन प्रणालीचा वापर सुरु करण्यात आला असून **e-POS** मशिन द्वारे पात्र लाभार्थ्यांना शिधाजिन्नसांचे वितरण लाभार्थ्यांना आधार क्रमांकाचा बायोमेट्रीक डाटा पडताळून करण्यात येते. लाभार्थी शिधापत्रिकाधारकांना देण्यात आलेला १२ अंकी शिधापत्रिका क्रमांक e-POS मशिन टाकला जातो व त्यानंतर शिधापत्रिकेतील सर्व सदस्यांची नावे **e-POS** मशिनवर दिसतात तदनंतर रास्तभाव दुकानात उपस्थितीत झालेल्या शिधापत्रिकाधारकांचा अंगठा मशिनवर ठेवून त्याची बायोमेट्रिक ओळख पटवीली जाते व पात्र लाभार्थ्यांना देय शिधाजिन्नसांचे वितरण केले जाते. झालेले व्यवहार **mahaepos.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून पात्र लाभार्थी आपले झालेले व्यवहार या संकेतस्थळावर पाहू शकतो.

# ONE NATION ONE RATION CARD

केंद्र शासनाचे पत्र क्र.F.NO.९(१)/२०१९.COMP.CELL (E:३६७७७०), DATE. २३/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये ONE NATION ONE RATION CARD ( IMPDS) या योजनेअंतर्गत आंध्रप्रदेश, बिहार, दमण व दिव, गोवा, गुजरात, हरियाणा, हिमाचलप्रदेश, झारखंड, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, मिझोरम, ओरीसा, पंजाब, राजस्थान, सिक्कीम, तेलंगणा, त्रिपुरा, उत्तरप्रदेश या वीस राज्यांमध्ये रेशन कार्डसंदर्भातील आंर्तराज्य पोर्टेबिलीटी कार्यान्वित करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक २३/०७/२०२० रोजीच्या पत्रांन्वये जम्मु आणि कश्मीर, मणिपूर, नागालँड आणि उत्तराखंड या चार राज्यांच्या देखील या योजनेअंर्तगत समावेश करण्यात आलेला आहे. केंद्र शासनामार्फत ONE NATION ONE RATION CARD (IMPDS) उपलब्ध करुन दिलेल्या योजनेअंतर्गत कोणत्या राज्याचा अन्न धान्याचा लाभ घेत असलेला लाभार्थी वरीलप्रमाणे कोणत्याही राज्यात त्याच्या आधारकार्ड लिंक व बायोमेट्रीक प्रणालीद्वारे अन्नधान्य घेऊ शकतो.

## केरोसीन वितरणाचे परिमाण

| मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र | आश्वासित केरोसीन योजनेप्रमाणे बिगर गॅसधारक हमीपत्र सादर केलेल्या शिधापत्रिकाधारकांना देय परिमाण (लिटर्समध्ये) - नोव्हेंबर, २०२० | | |
|---|---|---|---|
| | १ व्यक्ती | २ व्यक्ती | ३ व्यक्ती व त्यावरील |
| | २ लिटर | ३ लिटर | ४ लिटर |

## आश्वासित केरोसीन योजना

आश्वासित केरोसीन योजना माहे ऑगष्ट, २००५ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत शासनाकडून प्राप्त होणारे केरोसीन नियतन व परिमंडळ कार्यालयस्तरावर प्रत्येक महिन्यात अधिकृत शिधावाटप दुकानातून शिल्लक राहिलेला केरोसीन कोटा व १००% गरज याची सांगड घालून केरोसीन देय शिधापत्रिकांसाठी व्यक्तिनिहाय परिमाण निश्चित करण्यात येते. असे निश्चित केलेले परिमाण प्रसिध्दीपत्रकाद्वारे जाहीर करून सदर प्रसिध्दीपत्रक लोकप्रतिनिधी व स्वयंसेवी संस्था यांना देण्यात येते.

## नवीन अधिकृत शिधावाटप दुकाने मंजूर करण्याची कार्यपध्दती व प्राथम्यसूची

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक राभादु-१७१६/प्र.क्र.२३९/ना.पु.३१, दिनांक ०६.०७.२०१७ रोजीच्या निर्णयान्वये रास्तभाव/शिधावाटप दुकाने व

केरोसीन परवाने मंजूर करणेबाबत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,२०१३ च्या कलम १२ (१) (e) मधील तरतूदी खालीलप्रमाणे आहे.

१. "पंचायती, स्वयंसहाय्यता गट, सहकारी संस्था, यासारख्या सार्वजनिक संस्थांना किंवा सार्वजनिक न्यासांना रास्तभाव दुकानाचे परवाने देण्यास प्राथम्य देणे आणि महिला किंवा त्यांच्या समुदयाद्वारे रास्तभाव दुकानाचे व्यवस्थापन करणे"

२. त्यानुसार सध्याची रास्तभाव दुकाने/किरकोळ केरोसीन परवाने तसेच ठेवून आजमितीस रद्द असलेली व यापुढे रद्द होणारी, राजीनामा दिलेली व लोकसंख्या वाढीमुळे द्यावयाची नविन तसेच विविध कारणांमुळे भविष्यात द्यावयाची नवीन रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसीन परवाने खालील प्राधान्यक्रमानुसार मंजूर करण्यात यावेत.

i) पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)
ii) नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गट
iii) नोंदणीकृत सहकारी संस्था
iv) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था.
v) महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था.

३. वरील प्राधान्यक्रमानुसार रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसीन परवाने मंजूर केलेल्या दुकानांचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुदयाद्वारे करणे आवश्यक राहील.

दिनांक ०६.०७.२०१७ रोजीचे शासन निर्णयातील तरतूदीनुसार भविष्यात मंजूर करावयाच्या रास्तभाव दुकानासाठी वृत्तपत्रात जाहीरनामा प्रसिध्द करून इच्छुक संस्था/स्वयंसहाय्यता गट यांचेकडून अर्ज मागविण्यात येतात व प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने चौकशी अंती सदर निर्णयातील तरतूदीनुसार गठीत करण्यात आलेल्या समिती समक्ष दुकान मंजूरीसाठी संस्था/स्वयंसहाय्यता गट यांची निवड करण्यात येते व अशा संस्था/स्वयंसहाय्यता गटास महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप (द्वितीय) आदेश १९६६ च्या कलम ३ मधील तरतूदीनुसार मा.नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात दुकान मंजूर करण्याची कार्यवाही केली जाते.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्र.साविव्य-१०००/२३७०/प्र.क्र.२१७/२०००/ना.पु.२८, दिनांक ०९.०६.२००० अन्वये नविन रास्तभाव दुकान/ शिधावाटप दुकान मंजूरीसाठी विहीत केलेल्या एकांक संख्येनुसार सहकारी संस्थेस कमीत कमी ३००० एकांके व जास्तीत जास्त १०००० एकांकाकरीता अधिकृत शिधावाटप दुकान मंजूर करण्यात येते.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन परिपत्रक क्र.राभादु-२११७/प्र.क्र.१५७/ना.पु.३१, दिनांक ०७.०८.२०१७ अन्वये विहीत केलेल्या तरतूदीनुसार रास्तभाव दुकाने उघडण्यासाठी जाहीरनामा प्रसिध्द केल्यानंतर इच्छुक संस्था/स्वयंसहाय्यता गटांना अर्ज करण्याकरीता ३० दिवसांची मुदत दिली जाते.

प्रसिध्द केलेल्या जाहीरनाम्यानुसार क्षेत्रिय कर्मचा-यामार्फत प्राप्त अर्जाची प्राथमिक तपासणी/छाननी, जागेची तपासणी व इतर अनुषंगिक कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल शिधावाटप दुकान मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे प्रस्ताव पाठविले जातात. प्राधिकृत अधिकारी समितीच्या मान्यतेने शासनाने ठरवून दिलेल्या

प्राथम्यक्रमानुसार व दुकान मंजूरीसाठी आवश्यक असणाऱ्या अटींची व तरतूदींची पुर्तता केल्यानंतर अधिकृत शिधावाटप दुकान मंजूर करतात.

## अधिकृत शिधावाटप दुकानाचे प्राधिकारपत्र देणारे प्राधिकारी व दाद मागण्यासाठी यंत्रणा

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात अधिकृत शिधावाटप दुकान मंजूरीचे अधिकार मा.नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांना प्रदान करण्यात आले असून प्राधिकारपत्र देण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून संबंधित कार्यक्षेत्राचे मा. उपनियंत्रक शिधावाटप हे काम पाहतील.

पहिले अपिल करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन हे काम पाहतील.

## अधिकृत शिधावाटप दुकानदारांनी पाळावयाची तत्त्वे :-

१. प्रत्येक शिधावाटप दुकानाच्या दर्शनी भागात पुढीलप्रमाणे फलक लावणे बंधनकारक आहे.
२. परवानाधारकाचे नांव, दुकानाच्या कामाच्या वेळा, सुट्टीचे दिवस इत्यादी दर्शविणारा नामफलक
३. दुकानातील शिधाजिन्नसांची प्रत्येक दिवशी होणारी आवक, विक्री, शिल्लक साठा दर्शविणारा फलक
४. शिधाजिन्नसांची किरकोळ विक्रीचे दर दर्शविणारा फलक
५. शिधावाटप कार्यक्षेत्रातील दक्षता समिती सदस्यांची नांवे दर्शविणारा फलक
६. दुकानास जोडलेल्या शिधापत्रिका व त्यावरील लोकसंख्या एकांक दर्शविणारा फलक
७. शिधाजिन्नसांचे वितरण परिमाण दर्शविणारा फलक
८. शिधाजिन्नस किंवा शिधावाटप दुकानाबाबत ज्यांच्याकडे तक्रार करावयाची त्या अधिकाऱ्याचे पदनाम, पत्ता व दूरध्वनी दर्शविणारा फलक.

उपरोक्त माहिती एकाच फलकावर दर्शविणे आवश्यक आहे.

१. अंत्योदय अन्न योजना, बी.पी.एल. व अन्नपूर्णा लाभार्थ्यांची यादी नागरिकांना छाननीसाठी उपलब्ध ठेवावी.
२. प्रत्येक दुकानदाराने तक्रारवही दुकानाच्या दर्शनी भागी ठेवणे आवश्यक असून शिधापत्रिकाधारकाने मागणी केल्यास दुकानदाराने ती उपलब्ध करून दिली पाहिजे.
३. अधिकृत शिधावाटप दुकानदाराने शिधापत्रिकाधारकांना वितरीत करावयाच्या शिधाजिन्नसांचे नमुने शिधापत्रिकाधारकांच्या माहितीसाठी सिलबंद केलेल्या पॉलिथिन पिशव्यातून प्रदर्शित करण्याची पध्दत अंमलात आहे.
४. शिधाजिन्नस दिल्यानंतर दुकानदाराने त्याची शिधापत्रिकाधारकांना मराठीतून पावती दिलीच पाहिजे. तसेच पावतीच्या स्थळप्रतीवर शिधापत्रिकाधारकाची सही किंवा अंगठा घेतलाच पाहिजे व

शिधाजिन्नस ज्या प्रमाणात दिले जातील तेवढयाच नेमक्याच नोंदी शिधापत्रिकेवर दर्शविल्या पाहिजेत.

५. शिधावाटप दुकानातील वजन/मापे प्रमाणित असावीत. वजन/मापे प्रमाणित नसल्यास शिधापत्रिकाधारकास त्याबाबतची तक्रार वजन/मापे निरीक्षक कार्यालयाकडे करता येईल.

## अधिकृत शिधावाटप दुकानांच्या तपासण्या :-

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत शिधाजिन्नसांचे वितरण शिधापत्रिकाधारकांना व्यवस्थित होण्याचे दृष्टीने शिधावाटप दुकानाच्या कारभारावर देखरेख ठेवण्याकरीता त्यांनी गैरव्यवहार करू नये यासाठी दुकानांच्या संपूर्ण तपासण्या नियमितपणे करण्यात येतात. याखेरीज आकस्मिक तपासण्या करण्यात येतात. शिधावाटप दुकानांच्या तपासण्या नियमितपणे व परिणामकारक करण्यासाठी मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी करावयाच्या तपासणी बाबतची मानके दि.१७.४.२००१ च्या परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आलेली आहेत.

## फिरती अधिकृत शिधावाटप दुकाने -

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात विशेषत: दक्षिण मुंबईत जागांच्या भाव वाढीमुळे नवीन अधिकृत शिधावाटप दुकान सुरू करण्यात येणाऱ्या अडचणींमुळे शासनाने फिरती अधिकृत शिधावाटप दुकाने सुरू करण्यासाठी ३३ वाहने उपलब्ध करून दिली असून महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन, महाराष्ट्र राज्य कन्झुमर्स फेडरेशन, अपना बाजार यासारख्या सहकारी संस्था ठराविक अटींवर चालवित आहेत.

## केरोसीन परवाने -

महाराष्ट्र केरोसिन डिलर्स लायसेन्सिग ऑर्डर १९६६ अन्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात केरोसीनचे घाऊक परवाने देण्यात येतात. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तेल कंपन्या घाऊक वितरकाची नेमणूक करतात अशा वितरकास मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात केरोसीनचे घाऊक परवाने देण्यात येतात.

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात अधिकृत शिधावाटप दुकानामार्फत शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराचे केरोसीन वितरीत करण्यात येते. त्यामुळे मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात केरोसीनचे किरकोळ परवाने/हॉकर्स परवाने मंजूर करण्यात आलेले नाहीत.

## मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्राकडून देण्यात येणारे विविध परवाने -

या विभागामार्फत सद्यस्थितीत डाळी/कडधान्ये, धान, तांदूळ, खाद्यतेल व खाद्यतेल-बिया तसेच केरोसीन या जीवनावश्यक वस्तूंचा व्यापार करण्यासाठी व्यापा-यांनी घाऊक/किरकोळ परवाने काढणे आवश्यक आहे. सदर परवाने ५ वर्षाच्या कालावधीसाठी मंजूर करण्यात येतात व ५ वर्षानंतर नुतनीकरण करण्यात येते.

## मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात सार्वजनिक वितरण देखरेख दक्षता समित्या -

अधिकृत शिधावाटप दुकानदारांनी त्यांना वितरण करण्यासाठी मिळालेल्या शिधाजिन्नसांची परस्पर विक्री करू नये किंवा विल्हेवाट लावू नये यासाठी म्हणजेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत करण्यात येणा-या जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणावर देखरेख ठेवण्यासाठी शिधावाटप कार्यालयीन स्तरावर दक्षता समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. दक्षता समितीचे अध्यक्ष हे शिधावाटप कार्यालय क्षेत्रातील विधानसभा सदस्य असतात. समितीचे सदस्य सचिव हे शिधावाटप कार्यालयातील शिधावाटप अधिकारी असतात. समितीवरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती ही मा.पालकमंत्री यांच्या शिफारशीनुसार केली जाते. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत निर्माण होणा-या अडचणीसंदर्भात आढावा घेऊन त्याचे निराकरण करण्यासाठी दक्षता समितीची दरमहा बैठक आयोजित करण्यात येते.

| अ. क्र. | नाव | समितीचे सदस्य | पद | समितीचे उद्दीष्ट | किती वेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही? | सेवेचा कार्यवृत्तांत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दक्षता समिती | १. शिधावाटप क्षेत्रातील विधानसभा सदस्य | अध्यक्ष | सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तुंच्या वितरणावर देखरेख ठेवण्यासाठी | महिन्यातून एकदा बैठक घेण्यात येते | नाही | उपलब्ध |
| | | २. उर्वरित विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य किंवा त्यांनी सुचविलेले सामाजिक कार्यकर्ते | उपाध्यक्ष | | | | |
| | | ३. तीन महिला सदस्य | सदस्य | | | | |
| | | ४. विरोधी पक्षाचे दोन सदस्य (यापैकी एक महिला असावी. | सदस्य | | | | |
| | | ५. शिधावाटप कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील पाच नगरसेवक किंवा त्यांनी सुचविलेले सामाजिक कार्यकर्ते (यापैकी एक महिला असावी. महिला नगरसेवकांनी सामाजिक कार्यकर्ते सुचविल्यास ती महिला असणे आवश्यक राहील) | सदस्य | | | | |
| | | ६. नियंत्रक शिधावाटप, मुंबई किंवा जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेला रास्तभाव धान्य / शिधावाटप दुकानदारांचा एक प्रतिनिधी | सदस्य | | | | |
| | | ७. इतर दोन व्यक्ती (यापैकी एक ग्राहक चळवळीशी संबंधित असावा तसेच यापैकी | सदस्य | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एक महिला असावी.) | | | | | |
| | | ८. मुंबई शिधावाटप क्षेत्राकरीता संघटीत संस्थांचा एक प्रतिनिधी | सदस्य | | | | |
| | | ९. अनुसुचित जातीचा एक प्रतिनिधी | सदस्य | | | | |
| | | १०. अनुसुचित जमातीचा एक प्रतिनिधी | सदस्य | | | | |
| | | ११.अन्नधान्य वितरण अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेले अधिकारी / मुंबई शिधावाटप क्षेत्रासाठी शिधावाटप अधिकारी | सदस्य सचिव | | | | |

## <u>ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९</u>

**अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक ग्रासंनि-२०२०/ प्र.क्र.३९/ग्रासंनि-२, दि.१७ फेब्रुवारी, २०२२.**

**१) महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (राज्य व जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद) नियम, २०२२**

**(अ) राज्य ग्राहक संरक्षण परिषद :-**

- राज्यातील ग्राहकांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ नुसार राज्य ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.
- शासनाच्या दि.१७ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या अधिसूचनेनुसार राज्य ग्राहक संरक्षण परिषदेची संदस्य संख्या - शासकीय व अशासकीय सदस्य असे मिळून बावन्नपेक्षा अधिक सदस्य असणार नाहीत.
- मा.ग्राहक संरक्षण मंत्री, हे या परिषदेचे अध्यक्ष आहेत.
- राज्य ग्राहक संरक्षण परिषदेचा कालावधी तिची स्थापना झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा असेल, परंतु राज्य परिषद तीन महिन्यांच्या आणखी कालावधीकरीता किंवा ती पुनर्स्थापना होईपर्यंत किंवा यापैकी जे अगोदर येईल तोपर्यंत कामकाज सुरु ठेवू शकतील.

**(ब) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद :-**

- जिल्हा स्तरावरील ग्राहकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरीय ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.
- शासनाच्या दि.१७ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या अधिसूचनेनुसार जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची सदस्य संख्या - शासकीय व अशासकीय सदस्य असे मिळून बेचाळीसपेक्षा अधिक सदस्य असणार नाहीत.

➢ जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अध्यक्ष जिल्हयाचे जिल्हाधिकारी आहेत.

➢ जिल्हा ग्राहक सरंक्षण परिषदेचा कार्यकाळ, तिची स्थापनेच्या दिनांकापासून तीन वर्षे इतका असेल, परंतु जिल्हा ग्राहक सरंक्षण परिषद, तीन महिन्यांच्या आणखी कालावधीकरीता किंवा ती पुनर्गठीत होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत काम चालू ठेवतील.

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश,२०१५ अन्वये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिनस्त कार्यालयांमार्फत मुंबई व ठाणे विभागातील पात्र नागरीकांना पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवा नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपिल प्राधिकारी यांच्या अधिसुचित सेवांचा तपशिल पुढीलप्रमाणे :-

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली मर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | द्वितीय अपिल अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नविन शिधापत्रिका मागणी | ३० दिवस | शिधावाटप अधिकारी/ परिमंडळ अधिकारी | सहाय्यक नियंत्रक शिधावाटप | उपनियंत्रक शिधावाटप |
| २ | शिधापत्रिकेतील नावात दुरुस्ती. | ३ कार्यालयीन दिवस | शिधावाटप अधिकारी/ परिमंडळ अधिकारी | सहाय्यक नियंत्रक शिधावाटप | उपनियंत्रक शिधावाटप |
| | १) शिधापत्रिकेत नावे समाविष्ठ करणे/नाव वाढविणे. | गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस अन्यथा ३ कार्यालयीन दिवस | | | |
| | २) शिधापत्रिकेमधील नाव कमी करणे | ३ कार्यालयीन दिवस | | | |
| | ३) शिधापत्रिकेमधील पत्ता बदल करणे | ३० दिवस | | | |
| ३ | १) दुय्यम शिधापत्रिका (खराब/फाटलेली इत्यादी) | गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस अन्यथा ६ कार्यालयीन दिवस | शिधावाटप अधिकारी/ परिमंडळ अधिकारी | सहाय्यक नियंत्रक शिधावाटप | उपनियंत्रक शिधावाटप |
| | २) दुय्यम शिधापत्रिका | ३० दिवस | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (गहाळ शिधापत्रिका) | | | | |
| ४ | नवीन रास्तभाव दुकानाची मंजूरी | जाहीरनामा काढल्यानंतर १८० दिवस | नियंत्रक शिधावाटप | विभागिय आयुक्त/ जिल्हाधिकारी | सचिव/ विभागीय आयुक्त |
| ५ | रास्तभाव दुकानाच्या परवान्याचे नुतनीकरण | ६० दिवस | उपनियंत्रक शिधावाटप | नियंत्रक शिधावाटप | विभागीय आयुक्त |
| ६ | किरकोळ रॉकेल विक्री परवाने | ९० दिवस | अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ७ | किरकोळ रॉकेल विक्री परवान्याचे नुतनीकरण | ६० दिवस | अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |

## कार्यकारी व जबाबदार अधिकारी :-

शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश व परिपत्रकानुसार विभाग प्रमुख नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांच्या नियंत्रणाखाली परिमंडळ कार्यालये व शिधावाटप कार्यालये यांच्या कार्यालय प्रमुखामार्फत मुंबई-ठाणे शिधावाटप यंत्रणेचे कामकाज केले जाते. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांच्या मार्गदर्शनानुसार शिधावाटप यंत्रणेचे उपनियंत्रक शिधावाटप हे लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात पात्र शिधापत्रिकाधारकांना शिधाजिन्नसांचे वाटप सुरळीतपणे होईल यादृष्टीने कार्यवाही करतात. तसेच जीवनावश्यक वस्तूंचा गैरव्यवहार/अनियमिततांबाबत धाडी/तपासण्या करुन दोषींविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत कारवाई केली जाते. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत एक लाख व त्यावरील जप्त मुद्देमालासंदर्भात नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे अधिकारात कारवाई केली जाते तर एक लाखापेक्षा कमी जप्त मुद्देमालासंदर्भात परिमंडळ उपनियंत्रक शिधावाटप यांचे अधिकारात कारवाई केली जाते.

शिधापत्रिका, अधिकृत शिधावाटप दुकानदार, शिधाजिन्नस या संदर्भातील तक्रारीबाबत संबंधित शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालये यांचेमार्फत कार्यवाही केली जाते. तथापि, संबंधित शिधावाटप कार्यालयामार्फत तक्रारीची दखल न घेतल्यास, संबंधित परिमंडळ उपनियंत्रक शिधावाटप यांचेकडे दाद मागता येते. परिमंडळ उपनियंत्रक शिधावाटप यांचेकडून तक्रारीबाबत दखल/समाधान न झाल्यास नियंत्रक

शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे कार्यालयातील हेल्प लाईन क्र.२२८५२८१४ वर संपर्क साधता येईल.

# नागरी सनद

## २०२४-२०२५

**संचालनालय नागरी पुरवठा (गो/वा)**

**पुरवठा भवन, ४ था मजला,**

**जनरल नागेश मार्ग, परेल,**

**मुंबई -४०० ०१२**

# <u>नागरी सनद</u>

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालयाच्या अधिपत्याखालील संचालक नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई या कार्यालयाकडे सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत तसेच सद्यःस्थितीत राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत अंत्योदय व प्राधान्य कुटूंबातील लाभार्थीअंतर्गत मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी भारतीय खादय निगमच्या आगारातून अधिकृत वाहतूक कंत्राटदारांमार्फत अन्नधान्याची उचल करुन अधिकृत शिधावाटप दुकानदारांना थेट वितरण करणे तसेच नियंत्रीत साखरेचे शासकीय गोदाम भिवंडी येथे उतरवून घेवून वितरण करण्याचे कामकाज या कार्यालयाकडे आहे.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी मंजूर होणा-या नियतनानुसार प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत प्रति व्यक्तीस २ किलो तांदूळ व ३ किलो गहू याप्रमाणे तांदूळ रु.३/- प्रति किलो व गहू रु.२/- प्रति किलो या दराने एकूण ५ किलो व अंत्योदय या योजनेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना तांदूळ रु.३/- व गहू रु.२/- प्रति किलो या दराने दरमहा तांदूळ १६ किलो व गहू १९ किलो असे एकूण ३५ किलो अन्नधान्य उपलब्ध करुन दिले जाते. कल्याणकारी योजनेअंतर्गत सेवाभावी संस्थांना तांदूळ रु. ५.६५ प्रतीकिलो व गहू रु. ४.१५ प्रतीकिलो या दराने ४ किलो तांदूळ व ११ किलो गहू याप्रमाणे एकूण १५ किलो प्रतिलाभार्थी अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यांत येते.

माथाडी कामगारांच्या उच्च न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांमुळे दि. ०१.०७.२००१ पासून मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रातील शासकीय गोदामातील धान्याचे आवक/जावकचे कामकाज ठप्प आहे. परंतू भारतीय खादय निगमच्या बोरीवली, वाशी (तुर्भे), कळंबोली (पनवेल) व तळोजा (अदानी) या आगारातून अन्नधान्याची थेट उचल करुन लाभार्थी शिधापत्रिकाधारकांना अधिकृत ¾ाहतूक कंत्राटदारा मार्फत अन्नधान्याची उचल करुन अधिकृत शिधावाटप दुकानांना थेट वितरण करण्याची कार्यवाही केली जाते

<u>**धान्य उचलीची ठिकाणे :-**</u> १) भारतीय खादय निगम डेपो, बोरीवली, मुंबई

२) भारतीय खादय निगम वाशी (तुर्भे) नवी मुंबई

३) भारतीय खादय निगम कळंबोली पनवेल, जि.रायगड

४) भारतीय खादय निगम तळोजा (अदानी)

## राज्य शासनाची स्वतःच्या मालकीची गोदामे

| गोदामाचे नांव | साठा क्षमता एकूण मे. टन | मे.टन कार्यरत |
|---|---|---|
| **ठाणे कोपरी गोदाम,**<br>कोपरी कॉलनी, गावदेवी रोड, ठाणे (पूर्व) | **१७०६** | निवडणूकीच्या कामासाठी अधिग्रहीत केले आहे. |
| **भिवंडी गोदाम**<br>सरकारी धान्य गोदाम क्र.४ चा अर्धा भाग व गोदाम क्र.2 चा अर्धा भाग कोर्टाच्यासमोर, भिवंडी ४२१ ३०२ | **१२७९.५** | **५००** |
| **कल्याण गोदाम,**<br>मुरबाड रोड, रेस्ट हाऊसजवळ,४ व ५ आधारवाडी येथे | **२५९६** | निवडणूकीच्या कामासाठी अधिग्रहीत केले आहे. |
| **उल्हासनगर गोदाम,**<br>गांधी रोड, कॅम्प नं. ५, तहसिलदार कार्यालयाजवळ, उल्हासनगर-५ | **३१४२** | दि. १९.०८.२०१५ च्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाने वापर व वावर करण्यास अयोग्य असल्याचे कळविले आहे. |

**धान्याची गुणवत्ता** :-

शासकीय पध्दतीने अन्नधान्याची साठवणूक व निरिक्षण यासाठी भारत सरकारचे धान्य साठवणूक, संशोधन व प्रशिक्षण केंद्र, हापुर, उत्तरप्रदेश व हैद्राबाद आंध्रप्रदेश येथील दिर्घ कालावधीचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेले या कार्यालयांतील तंत्र प्रशिक्षित अधिकारी/कर्मचा-यांकडून गोदामांतून धान्याची उचल करण्यापुर्वी सदर धान्यसाठा सर्वसाधारण गुणवत्ता दर्जाचा (F.A.Q) असण्याची खात्री केल्यावर धान्याची उचल करण्यांत येते.

**कार्यकारी व जबाबदार अधिकारी :-**

शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश व परिपत्रकानुसार व विभाग प्रमुख नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे नियंत्रणाखालील संचालनालय नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई कार्यालयांतील कार्यालय प्रमुख - उप संचालक नागरी पुरवठा (गोदाम) पदावरील अधिकारी हे नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे मार्गदर्शनाखाली धान्याचे नियतन उपलब्ध करुन घेणे, मागणीपत्रानुसार वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांचेकडून धान्याच्या किंमतीचे धनादेश प्राप्त करुन

घेणे, भारतीय खादय निगमकडून वितरण आदेश घेणे व नियत केंद्रावरुन धान्याची उचल करणे इत्यादी कामे प्रशाकीय व आर्थिक अधिकाराचे मर्यादीत विहित कालावधीत पुर्ण करुन घेण्यासाठी व विविध योजनेनुसार उपलब्ध धान्य साठा विहीत कालावधीत पुरविण्यासाठी जबाबदार अधिकारी आहेत.

**<u>तक्रार निवारण</u> :-**

संबंधित कामाबदद्ल काही तक्रार असल्यास ती पुढील नमुद स्तरावरील अधिका-यांकडे करता येईल.

**<u>स्तर एक</u>** :- **उप संचालक नागरी पुरवठा (गोदाम)**
संचालनालय नागरी पुरवठा (गो/वा) कार्यालय,
पुरवठा भवन, ४ था मजला,
परेल, मुंबई ४०० ०१२

**<u>स्तर दोन</u>** :- **नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,**
५ वा मजला, रॉयल इन्शुरन्स इमारत, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०

वरीलप्रमाणे अधिका-यांकडून तक्रारींचे निवारण करण्यांत येते. तथापि या स्तरावर तक्रारींचे निवारण झाले नाही अशी धारणा असल्यास संबंधित प्रकरण परत्वे मा. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई किंवा संबंधित खात्याचे प्रभारी मा.मंत्री महोदयांकडे व्यथा मांडू शकतात.